दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३१६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२७ जून २०२५

"सुरवात करायची असेल तर आजपासूनच करा, उद्यापासून करू असं म्हंटल तर तो उद्या कधीच येत नाही".

# महाराष्ट्राच्या राजकारणातील ऐतिहासिक घडामोड, दोन ठाकरे एकत्र येणार?



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. हिंदीसक्ती विरोधात मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आक्रमक झाले आहेत. दोन्ही नेते हिंदीसक्ती विरोधात मुंबईत मोर्चा काढणार आहेत. उद्धव ठाकरे यांची आज पत्रकार परिषद पार पडली. यावेळी त्यांनी आपण ७ जुलैला मोर्चा काढणार असल्याचं जाहीर केलं. यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची पत्रकार परिषद पार पडली.

यावेळी हिंदीसक्ती विरोधात ६ जुलैला मोर्चा काढणार असल्याचं जाहीर केलं. पण ६ जुलैला आषाढी एकादशी आहे. त्यामुळे मनसेकडून ५ जुलैला मोर्चा काढला जाणार असल्याचं जाहीर करण्यात आलं आहे. यानंतर आता पडद्यामागची मोठी घडामोड समोर येत आहे. दोन्ही ठाकरेंच्या पक्षाकडून एकत्र मोर्चा घेण्यासाठी हालचाली सुरु झाल्याचं वृत्त काही मराठी वृत्त वाहिन्यांनी सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे. यामुळे आता ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या चर्चांना जास्त उधाण आलं आहे.

राज्यात शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून तीन भाषांचं सूत्र अवलंबलं जात आहे. यानुसार आता मराठी माध्यमातील शाळांमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषेचं शिक्षण दिलं जाणार आहे. पण या निर्णयास राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा विरोध आहे. ठाकरे बंधूंकडून मोर्चा काढण्यात येणार आहे. राज ठाकरे यांनी आपल्या मोर्चात सर्व मराठीजणांना एकत्र येण्याचं आवाहन केलं आहे. आपल्या मोर्चाला कोणत्याही पक्षाचा झेंडा नसेल. या मोर्चाचं नेतृत्व मराठी माणूसच करेल. केवळ मराठी व्यक्ती म्हणून सर्वांनी एकत्र यावं, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

राज ठाकरे यांच्या आवाहनानंतर आता उद्धव ठाकरे राज ठाकरे यांच्यासोबत एकाच मोर्चात सहभागी होणार का? असा प्रश्न उस्थित होतोय. विशेष म्हणजे या चर्चांना पोषक अशा घडामोडी पडद्यामागे घडत असल्याची देखील माहिती आहे. पण या वृत्ताला कुणाकडूनही अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही.

**दोन्ही ठाकरे एकत्र आले तर महाराष्ट्रातलं राजकारण बदलणार**

या मोर्चाच्या निमित्ताने दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले, आणि त्यांच्यातील सलोखा आणखी वाढला तर महाराष्ट्राचे राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत त्यामुळे मोठा फरक पडण्याची शक्यता आहे. याशिवाय फक्त मुंबईच नाही तर राज्यभरात त्याचे पडसाद पडताना दिसतील.

याशिवाय दोन्ही पक्षांना त्याचा फायदा होऊ शकतो. तसेच दोन भाऊ एकत्र आल्याने महाराष्ट्राचं राजकारण बदलण्याची शक्यता आहे. पण दोन्ही भाऊ खरंच एकत्र येतील का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# पारनेमधील टोमॅटो उत्पादकांचा हंगाम तोट्यात...



### * मे महिन्यात पडलेल्या जास्तीच्या पावसाचा परिणाम

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** मे महिन्यात पडलेल्या अतिपावसाचा टोमॅटो पिकाला मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. पिकावर मोठ्या प्रमाणात किडी आणि विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. उत्पादन घटल्याने शेतकर्यांचे अर्थकारण कोलमडले आहे. त्यात भर म्हणजे टोमॅटोचे बाजारभाव देखील गडगडले आहेत. २२ किलो वजनी टोमॅटोचे क्रेटला अवघा शंभर ते तीनशे रुपयांपर्यंत बाजारभाव मिळत आहे.

दर वर्षाप्रमाणे यंदाही पारनेर तालुक्यामध्ये टोमॅटोची उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात लागवड झाली आहे. मे महिन्यात पडलेल्या पावसामुळे या टोमॅटो उत्पादकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक टोमॅटोच्या बागा शेतकर्यांनी उपटून टाकल्या आहेत. तिरंगा, खर्डा, चिरटा या विषाणूजन्य व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात वाढला आहे. सतत पंधरा दिवस पडलेल्या मुसळधार पावसाने टोमॅटोची फळे काळी पडली आहेत. टोमॅटो रंगीबेरंगी होण्याचे प्रमाण वाढले आहे. फळे चिरटली आहेत. या सर्वामुळे टोमॅटोला व्यापारी खरेदी करीत नाहीत. वडीच्या भावाने व्यापार्यांकडून या टोमॅटोला मागणी होत आहे, तर चांगला बाजारभाव मिळत नसल्यामुळे काही शेतकरी बाजारात विक्रीला आणलेले टोमॅटो पुन्हा घरी घेऊन जात आहेत.

उन्हाळ्यामध्ये टोमॅटोचे पीक जगवण अतिशय अवघड काम असते. तीव्र ऊन व पाण्याची कमतरता, यावर मात करून शेतकर्यांनी टोमॅटोच्या बागा वाचविल्या होत्या. परंतु, मे महिन्यामध्ये झालेल्या पावसामुळे त्यावर पाणी फेरले गेल्याची खंत शेतकरी गणेश चौधरी यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले की, दोन महिन्याचा बाग या पावसामुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. टोमॅटोला चांगली फळे लागली होती. परंतु, जास्तीच्या पावसाने ही सगळी फळे काळी पडली असून, फळाला हात लावताच ती गळून पडत आहेत.

सध्या टोमॅटोला बाजारभाव देखील फारसा मिळत नाही. १०० रुपये ते ३०० रुपयांदरम्यान २२ किलो वजनाच्या क्रेटला बाजारभाव मिळत आहे. या कमी बाजारभावामध्ये टोमॅटोची तोडणी करणे आणि वाहतूक करणे शेतकऱ्याला परवडत नाही. त्यामुळे यंदाच्या वर्षी मे महिन्यात आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचा टोमॅटोचा हंगाम पूर्णपणे तोट्यात गेला आहे.

# आषाढीनिमित्त नाशिक जिल्ह्यातून धावणार ३०० जादा बसेस




**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, नाशिक :** पंढरपूरच्या विठुरायाच्या भेटीची ओढ लागलेल्या भाविकांना पंढरपूरची वारी घडविण्यासाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळ सज्ज झाले आहे. जिल्ह्यातील विठुभक्तांना दर्शन घडविण्यासाठी २ ते ११ जुलै या कालावधीत महामंडळाच्या नाशिक विभागाने जादा बस सोडण्याचे नियोजन केले आहे. जिल्ह्यातून ३०० जादा बस भाविकांना सेवा पुरविणार आहे. दरवर्षी होणाऱ्या गर्दीचा अंदाज घेऊन एसटी महामंडळाच्या नाशिक विभागाने यंदा जादा बस सोडण्याचे नियोजन केले आहे. ६ जुलैला आषाढी शुद्ध एकादशी आहे. हा पंढरपूरच्या यात्रेचा प्रमुख दिवस आहे. तसेच १० जुलै रोजी गुरुपौर्णिमा आहे. यामुळे २ जुलै ते ११ जुलै या कालावधीत नाशिक-पंढरपूर मार्गावर जादा बस सोडल्या जातील. नाशिक, मालेगाव, सटाणा, कळवण, मनमाड, चांदवड, येवला, लासलगाव, पिंपळगाव बसवंत, नांदगाव, सिन्नर, इगतपुरी व पेठ येथून बस सोडल्या जाणार असून, यात सवलती लागू राहतील.

प्रकाश आंबेडकरांनी वेळ वाया घालवला, वाढलेल्या ७६ लाख मतांवरुन हायकोर्टाने सुनावले खडे बोल

**मार्गनिहाय नियोजन**

**प्रवास मार्ग – बसभाडे (रुपये)**

नाशिक – अहिल्यानगर– पंढरपूर – ६३४
मालेगाव – शिर्डी– पंढरपूर – ६४४
सटाणा –मनमाड –पंढरपूर– ६९४
देवळा – मनमाड– पंढरपूर – ६६४
कळवण– मनमाड पंढरपूर – ६९४
मनमाड अहिल्यानगर –पंढरपूर ५८४
चांदवड – मनमाड– पंढरपूर – ६२६
येवला– अहिल्यानगर पंढरपूर – ५४४
लासलगाव – शिर्डी –पंढरपूर – ६०४
पिंपळगाव –नाशिक –पंढरपूर – ६८४
नांदगाव –येवला –पंढरपूर – ६२४
सिन्नर – अहिल्यानगर –पंढरपूर – ५७४
इगतपुरी – नाशिक– पंढरपूर – ६९४
पेठ –नाशिक –पंढरपूर – ७१५

### २० हजार प्रवाशांची एसटीमुळे झाली सोय...

**पुणे :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यामध्ये अनेक भाविक पुणे ते सासवड दरम्यान सहभागी होतात. पालखी सोहळा सासवड मुक्कामी पोहोचल्यानंतर पुण्याला येण्यासाठी वाहनाची सोय नसते. या पार्श्वभूमीवर पुणे एसटी विभागातून सासवड ते पुणे दरम्यान १७५ विशेष बस सोडण्यात आल्या होत्या. यातून २० हजार प्रवाशांनी प्रवास केला.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा पुण्यातून रवाना झाल्यावर अनेक भाविक एक दिवसाची पायी वारी करतात. तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात परत येण्यासाठी वाहनांची सोय आहे; परंतु ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा सासवडला जाताना हा रस्ता पूर्ण वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येतो.

## थोडक्यात

### सुलतानपूर येथील पावसाळी पाण्याची उपाययोजना करून विल्हेवाट न लावल्यास जलसमाधी आंदोलन



**अक्षराज : उध्दव आटोळे**
**दि.२६, लोणार :** लोणार तालुक्यातील सुलतानपूर येथे शेगाव पंढरपूर पालखी मार्गाच्या साईडला नाली न बांधल्याने नागरिकांच्या घरात शिरले पाणी, लोणार तालुक्यातील सुलतानपूर येथे २६ जून रोजी दुपारी २ वाजता शेगाव पंढरपूर पालखी मार्गाच्या साईडला नाली न बांधल्याने नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरले.

सुलतानपूर गावातून शेगाव पंढरपूर पालखी मार्ग गेलेला आहे पालखी मार्गाच्या दोन्ही साईडला ग्रामपंचायत प्रशासनाने नाली बांधकाम न केल्यामुळे नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरून जीवनावश्यक वस्तू व धान्यासह नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले याबाबत

मेहकर – लोणार विधानसभा नेते तथा ग्रामपंचायत सदस्य संघपाल पनाड यांच्या नेतृत्वात रस्ता रोको आंदोलन करुन निवेदन दिले. यावेळी, युवा नेते अनित्य घेवंदे, असिम भाई पठाण, ग्रामपंचायत सदस्य शेख अमीर भाई, संतोष शिंदे, दिपक राजगुरू, सद्दाम भाई, सुमन मारुती पनाड,सागर निर्मळे, सिमा संतोष पवार, सुनिता ज्ञानेश्वर हरकाळ, जाकीर खा शौकत खा पठाण ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वासुंदे ते पंढरपूर पायी दिंडीचे उत्साहात प्रस्थान सुजित झावरे पाटील यांच्या वतीने रेनकोटचे वाटप



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२६, अहिल्यानगर :** तालुक्यातील वासुंदे येथिल श्री. भाऊसाहेब महाराज पायी दिंडीचे नुकतेच श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान झाले असून यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले असल्याची माहिती अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी दिली.

वासुंदे येथून दरवर्षीप्रमाणे श्री संत भाऊसाहेब महाराज पायी दिंडी सोहळा आषाढी एकादशी निमित्ताने ज्ञानोबा तुकाराम च्या जयघोषात टाळ मृदंगाच्या गजरात भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले. टाकळी ढोकेश्वर येथे देवकृपा फाउंडेशन व सुजित झावरे पाटील यांच्या वतीने वारकऱ्यांना पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी रेनकोट वाटप करण्यात आले. यावेळी उद्योजक लहू जाधव, शिवाजी रोकडे, संकेत झावरे आणि अनेक वारकरी व महिला उपस्थित होत्या.

### ओव्हरटेक करण्याच्या नादात रिक्षाला धडक दोन जणांचा जागीच मृत्यू



**दि.२५, अकोला :** अकोल्यातील पातूर तालुक्यातल्या बाभूळगाव जवळ झालेल्या भीषण अपघात त दोन जनांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात एक जण गंभीर तर काही जण किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. अपघात इतका भीषण होता की, दोघांचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार एका ट्रकने प्रवाशी ऑटोला जोरदार धडक दिली. ऑटोतील प्रवाशी बाहेर फेकले गेले. दरम्यान अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी जखमींना तातडीने रुग्णालयात हलविले तर ट्रकचालक हा घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे. दरम्यान याप्रकरणी पातूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पातूर पोलीस करीत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बाळापुर ते पातुर रोडवरील आयटीआय कॉलेजसमोर ट्रक व ऑटोची जोरदार धडक झाली. सकाळी नऊ वाजताच्या दरम्यान पातुरकडून प्रवासी ऑटो क्रमांक एमएच ३० बीसी २०७१ हा अंबाशी येथे जात असताना ट्रक क्रमांक चक१८ बीजी ८४९४ याने ओव्हरटेक करण्याच्या नादात समोरून येणाऱ्या ऑटोला मागून जबर धक्का मारल्याने सदर ऑटो हा विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रक क्रमांक ०९ ४४२६ ला धडकला. ऑटो प्रवासी पियुष रवींद्र सतरकर (वय १३) राहणार सिंधी कॅम्प, अकोला व लिलाबाई ढोरे (वय ५) राहणार लाखनवाडा हे दोघेही जागीच ठार झाले. सुरेंद्र चतरकर (वय ४५), रवींद्र चतरकर (वय ५२), रूपचंद वाकोडे (वय ५०), प्रमिलाबाई वाकोडे (वय ६५) हे गंभीर जखमी झाले असून पातुर पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने जखमीस पुढील उपचारासाठी अकोला येथे पाठविले असून पुढील कारवाई पातुर पोलीस करीत आहेत.

दरम्यान अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात हलविले तर ट्रक चालक हा घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे. दरम्यान याप्रकरणी पातूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पातूर पोलीस करीत आहेत. या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे. ओव्हरटेक करण्याच्या नादात हा भीषण अपघात झाला आहे. जखमींवर उपचार सुरू असून त्यांची तब्येत स्थिर असल्याचीही माहिती मिळतंय.

## संपादकीय

### देशी वृक्षांची लागवड करा

मागील काही वर्षात शहरात सिमेंटच्या जंगलाने गर्दी केली आहे. मोठमोठ्या इमारती आणि टॉवर्स उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. जितक्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली तितक्या प्रमाणात वुक्ष लागवड करण्यात आली नाही. परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा परिणाम तापमान वाढीवर झाला. तसेच बेसुमार वृक्षतोडीमुळे अनियमित पाऊस, उष्णता अशा संकटांना तोंड द्यावे लागले. यावर मात करण्यासाठी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी या मोहिम अंतर्गत लाखो वृक्षांची लागवड केली जाते. या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक व सेवाभावी संस्था, तरुण मंडळांनी यात हिरीरीने भाग घेतला. नागरिकांनीही आपल्या घराजवळ, बागेत, शेतात मोकळ्या जागेत, माळरानावर वृक्षारोपण केले. यावर्षीही ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे. या वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करणे आवश्यक असताना ज्या परदेशी वृक्षांची आपल्याला आवश्यकता नाही ; त्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हे ही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बुंध्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखी सरास् दिसणारे पक्षी दिसेनासे झाली आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्षांद्वारे होणाऱ्या बिजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या आस्तित्वशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते.

या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. विदेशी वृक्ष पुरेसा ऑक्सीजनही देत नाहीत. देशी वृक्ष जितका ऑक्सीजन देतात तितका ऑक्सीजन विदेशी वृक्ष देत नाहीत. काही देशी वृक्ष तर चोवीस तास ऑक्सीजन देतात. वातावरणातील ऑक्सीजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीतजास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.

# शेतकरी बापाला बाप म्हणायची लाज कसली?




नुकताच फेसबुकवर एक व्हिडिओ पाहण्यात आला. हा व्हिडिओ होता, एका शेतकरी बापाचा आणि हायकोर्टातील त्याच्या वकील मुलाचा. आपल्या मुलाला खरवस खूप आवडतो, म्हणून एकेदिवशी आई आपल्या मुलासाठी खरवस घेऊन त्या मुलाच्या बापाला कोर्टात पाठवते. बापाचे राहणीमान साधे असल्यामुळे तो बिचारा शेतकरी बाप आपल्या शेतकरी पोशाखात तो खरवस घेऊन आपल्या मुलाला देण्यासाठी कोर्टात निघाला. कोर्टात गेल्यावर बापाने मुलाची विचारपूस केल्यावर मुलगा ऑफिसमध्ये असल्याचे बापाला समजले. बाप ऑफिसमध्ये गेला आणि मुलाने बापाकडे पाहिले, तेव्हा बापाचा शेतकरी पोशाख पाहून मुलाला खूप राग आला. ऑफिसमध्ये इतर सहकारी वकील बसल्यामुळे त्या वकिलांसमोर मुलाला स्वतःच्या बापाला बाप म्हणायची लाज वाटू लागली. कारण बाप साध्या कपड्यात व शेतकरी पोशाखात आला होता. जर इतर वकिलांना हा आलेला माणूस जर माझा बाप आहे म्हणून कळाले तर माझा अपमान होईल, म्हणून त्या वकील मुलाने आपल्या बापाला ओळख न देता ऑफिस मधून बाहेर काढले. आणि इथून चालते व्हा, परत इकडे येऊ नका म्हणून बजावून सांगितले. तेव्हा तो बाप ऑफिसच्या बाहेर आला आणि त्या ऑफिसच्या खिडकी जवळ येऊन थांबला. इतर वकिलांनी त्या बापाच्या मुलाला विचारले की, हा आलेला माणूस तुमचा कोण होता? तेव्हा त्या मुलाने स्पष्ट भाषेत सांगितले की, तो आलेला माणूस माझ्या शेतातील सालगडी होता, त्या मुलाच्या बापाने मात्र खिडकी जवळ थांबून हे सर्व ऐकले, तेव्हा त्याच्या काळजात चर्र झाले. आणि मनाला खूप वेदना झाल्या. आणि तो बाप तिथून तो खरवस घेऊन घरी परत आला. घरी आल्यावर तो बाप ढसाढसा रडू लागला. त्याला खूप दुःख वाटू लागले. त्याच्या मनाला खूप वेदना होऊ लागल्या. त्याचे काळीज फाटल्यासारखे झाले होते. ज्या मुलाला आपण जन्म देऊन लाडाकोडात लहानाचे मोठे केले. त्याला बोटाला धरून चालायला शिकवले, त्याच्या शिक्षणासाठी जीवाचे रान करून व सावकाराचे कर्ज काढून त्याच्या शिक्षणाला पैसा लावला, त्याला उच्च शिक्षित करून त्याला हायकोर्टाचा वकील बनवले तोच मुलगा वकील झाल्यावर स्वतःच्या बापाला माझ्या शेतात काम करणारा सालगडी म्हणतो. तर त्या बापासाठी ही खरोखरच किती दुर्भाग्याची व खेदाची बाब म्हणावी लागेल. त्या बापाचे मन काय म्हणत असेल? याचा विचार करून बघा. ज्या दिवशी त्या बापाला पोटच्या मुलाने सालगडी म्हटले तेव्हापासून तो बाप खूप डिप्रेशनमध्ये राहू लागला. सारखा उदास व निराश राहून विचार करू लागला. त्याच्या मनात सारखे आत्महत्येचे विचार रुंजी घालू लागले. पोटच्या मुलाने आपल्याला असे का म्हटले? आपण त्याला जन्म देऊन गुन्हा केला काय? त्याला याच्यासाठीच उच्चशिक्षित केले काय? त्याला मला बाप म्हणायची लाज का वाटते? बाप असून सुद्धा त्याने मला सालगडी का म्हटले? असे अनेक प्रश्न त्याच्या मनात थैमान घालू लागले. आणि अखेर त्या बापाने टोकाचा निर्णय घेऊन व गळफास लावून आत्महत्या केली. स्वतःचे जीवन संपवून तो बाप कैलासवासी झाला. मुलाला ही बातमी समजल्यावर जेव्हा मुलगा मातीला आला तेव्हा मुलगा मात्र ढसाढसा रडू लागला. त्याला आपली चूक लक्षात आली. आपण आपल्या बापाला उगीच सालगडी म्हटले. म्हणून तो पश्चातापात पडला होता. आपण आपला बाप गमावला म्हणून तो हंबरडा फोडू लागला. तेवढ्यात कोणीतरी म्हणाले तू बाप नाही तर देव गमावलास पोरा. आजकाल बापाच्या जीवावर शिकून मोठ्या पदावर विराजमान झालेले क्लासवन अधिकारी आपल्या जन्मदात्या आई-वडिलांना विसरून जात आहेत. आई-वडिलांच्या जीवावर आपला डोलारा उभा राहिला आहे, याचे त्यांना भान राहिले नाही. आई-वडिलांनी आपल्यासाठी किती कष्ट उपसले? किती परिश्रम करून आपल्याला उच्चशिक्षित केले? आई-वडिलांमुळेच आज आपण सुखाचे दिवस बघत आहोत. आई-वडिलांनी जर आपल्याला शिक्षण शिकवले नसते, तर आज आपण कोणाच्यातरी दावणीला बांधलेले असतो.कोणाच्यातरी शेतात सालगडी म्हणून राहिलो असतो. आज आपले काय हाल असते? याचा विचार न केलेलाच बरा. कारण ज्या आई-वडिलांनी आपल्याला शून्यातून विश्व निर्माण करण्यासाठी खंबीरपणे साथ दिली, त्या आई वडिलांच्या उपकाराची जाणीव न ठेवता त्यांना जर गद्दार होत असाल, त्यांना बाप म्हणण्याऐवजी सालगडी जर म्हणत असाल तर तुमच्या त्या शिक्षणाला आणि तुमच्या त्या डिग्रीला काय जाळायचे आहे? स्वतःच्या जन्मदात्या बापाला बाप म्हणायची जर लाज वाटत असेल तर तुम्ही आत्महत्या करून जीवन संपवलेले बरे. तुमच्या जीवन जगण्याला काहीच अर्थ राहणार नाही. बाप कसाही राहत असला, कसाही वागत असला, राहणीमान साधे असो किंवा उच्च दर्जाचे असो, कपडे मळके असो किंवा व्हीआयपी असो तर त्या बापाला बापच म्हणावे लागते. केवळ बाप मळक्या कपड्यात म्हणजे शेतकरी पोशाखात भेटायला आला म्हणून बापाला सालगडी म्हणणारी औलाद जर बापाच्या पोटाला जन्माला आली असेल तर ती त्या बापासाठी खरंच किती दुर्भाग्याची बाब म्हणावी लागेल. शिकलेली मुले जर शिकून असे वागत असतील तर त्या शिक्षणाला काय किंमत? असे कितीतरी उच्च शिक्षित नोकरदार आहेत जे की, बाप शेतकरी पोशाखात ऑफिसमध्ये भेटायला आल्यावर आपल्या सहकारी मित्रांसमोर अपमान होऊ नये म्हणून स्वतःच्या बापाला बाप म्हणण्याऐवजी नोकर, सालगडी किंवा वेटर म्हणतात. अशा निष्ठूर, अविचारी आणि निर्दयी नोकरदार मुलांनी स्वतःच्या नावापुढे बापाचे नाव काय म्हणून लावायचे? बापाला नोकर किंवा सालगडी म्हणणारे उच्चशिक्षित नोकरदार आई-वडिलांना काय म्हणून सांभाळतील? म्हातारपणात त्यांची सेवा करतील का? का पत्नीचे ऐकूण त्यांना अंतर देतील? मला तर असे वाटते की, स्वतःच्या आईवडिलांना सालगडी व नोकर म्हणणारे नोकरदार आईवडिलांना म्हातारपणात वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवल्याशिवाय राहणार नाहीत. हे मलाच नाही तर कोणालाही मान्य करावेच लागेल. कारण आजकाल हायफाय संस्कृती निघाली आहे. आणि या हायफाय संस्कृतीत शेतकरी आईवडील कुठेच बसत नाहीत. शालेय आणि कॉलेज जीवनात मी पाहिलंय की, बरेच मुले मुली आपल्या शेतकरी बापाला शाळेत आणायला घाबरायचे. कारण त्यांना माहीत होते की, आपला बाप मळक्या शेतकरी पोशाखात राहतो. शाळेत आणल्यावर शिक्षकांसमोर आणि मित्र मैत्रिणींसमोर आपला अपमान होईल, मित्र व मैत्रिणी आपल्याला कमी समजतील या भीतीपोटी स्वतःच्या बापाला शाळेत न बोलावणारे विद्यार्थी देखील काही कमी नाहीत. यांना स्वतःच्या बापाला जर शाळेत आणि कॉलेजमध्ये आणायला लाज वाटत असेल. तर पुढे चालून हीच मुले मुली आपल्या बापाला सालगडी व नोकर म्हटल्याशिवाय राहणार नाही. स्वतःच्या बापाला म्हातारपणात निराधार केल्याशिवाय राहणार नाहीत. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एका मुलाचे आईवडील खूप गरीब होते. त्यांची परिस्थिती खूप हालाखीची होती. स्वतःला गुंठाभर देखील शेती नव्हती. दुसऱ्यांच्या शेतात काम केल्याशिवाय पोट भरत नसे. त्यांना तीन मुली व एक मुलगा होता. खाणारी तोंडे जास्त असल्यामुळे त्यांची आभाळ होत असे. अशा हालाखीच्या परिस्थितीत त्या बापाने अहोरात्र मेहनत करून व कष्टाची व अवजड कामे करून आपल्या मुलाला भरपूर शिक्षण शिकवले आणि उच्चशिक्षित करून त्याला एल.आय.सी ऑफिसर बनवले. नुकताच तो मुलगा क्लासवन अधिकारी झाला आणि कामावर रुजू झाल्यावर काही दिवसांनी त्याचा बाप खुशीने व आनंदाने आपल्या ऑफिसर मुलाला भेटायला ऑफिसला गेला. बाप बिचारा आपल्या शेतकरी पोशाखात म्हणजे मळक्या कपड्यात मुलाला भेटायला गेला. मुलगा मात्र व्हीआयपी लोकांमध्ये टायकोटात खुर्चीवर बसलेला होता, अचानक त्याचा बाप ऑफिसमध्ये आला आणि मुलाला पाहून तो खूप आनंदी झाला. मुलाला बोलू लागला पण मुलगा मात्र ओळख नसल्यासारखा करू लागला. तुम्ही कोण आहात? मी तुम्हाला ओळखत नाही. इथून चालते व्हा नाहीतर धक्के देत बाहेर काढावे लागेल असे म्हणू लागला. तेव्हा तो बिचारा बाप दुःखी होऊन तिथून निघून गेला. माझ्या मुलाने मला असे कसे बोलले? मी याला शिकवून काय गुन्हा केला का? याच्या शिक्षणासाठी जीवाचे रान करून पैसा लावला आणि शेवटी तो मला ओळख द्यायला सुद्धा तयार नाही. या विचाराने तो ग्रस्त झाला. सारखा तोच तो विचार करू लागला. या विचाराने त्याचे जेवण सुद्धा कमी झाले आणि शेवटी तो मरण पावला. मुलाने बापाला खूप सुख द्यायचे सोडून, बापाला आनंदात ठेवायचे सोडून, बापाला दुःखाच्या महासागरात लोटून शेवटी उपकाराच्या बदल्यात मृत्यू दिला. म्हणजे आजकालची सुशिक्षित मुले आपल्या जन्मदात्या आई-वडिलांसाठी उपकाराच्या बदल्यात मृत्यू देत असतील तर त्यापेक्षा मुलांना शिक्षण न दिलेलेच बरे. शिक्षण कोणत्या दर्जाचे मिळत आहे? आणि शिकलेली मुलेच असे का वागतात? मुलांना शिक्षणाबरोबरच संस्काराची सुद्धा गरज आहे हे प्रत्येक आई-वडिलांनी व शिक्षकांनी ध्यानात ठेवावे. मुलांना शिक्षण योग्य मिळत आहे म्हणून मुले नोकरीला लागत आहे. पण मुलांना योग्य संस्कार मिळत नाहीत म्हणून मुले आई-वडिलांसोबत वाईट व्यवहार करत आहेत. आई-वडिलांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत आहेत. आणि म्हणूनच आजकालच्या सुशिक्षित नोकरदार मुलांना स्वतःच्या बापाला बाप म्हणायची लाज वाटत आहे. त्यासाठी शिक्षणाबरोबरच मुलांना संस्काराची गरज आहे....असे मला वाटते...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## अंतर्भाव...

काहीनेत्यांना सवय
दावे आपला प्रभाव
रेटूननेटून बोलायचे
जरीअनुभव अभाव

ठाव न लागे मनाचा
तो विक्षिप्त स्वभाव
बदलत राहती रुपडे
जर ना लागे निभाव

सारे फासे मजहाती
दिखावटीआविर्भाव
खरेरूपडे कोणते ते
न उमजेल अंतर्भाव

महत्वआपले वाढवे
किती करी बडेजाव
अंगावर जर शेकता
त्वरितकरी घुमजाव

जिव्हा करे सळसळ
बोलत राहती अचाव
दुजा लटकू फासावर
आधीस्वताचा बचाव

आम्ही असू सर्वेसर्वा
फुकट करता बनाव
कधी ते नावा निराळे
बदनाम नको रे नाव

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# रेशन कार्ड कॅम्प हे सर्वसामान्यांसाठी : दीपक लंके

## बाळासाहेब खिलारी यांच्या संकल्पनेतून रेशन कार्ड कॅम्प





**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर)** : रेशन कार्डच्या संदर्भात अनेक समस्या आहेत. रेशन कार्ड अभावी अनेक शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही रेशन कार्ड हे एक प्रकारे आपली ओळख आहे. हे लक्षात घेऊन प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब खिलारी हे पारनेर तालुक्याच्या उत्तर भागामध्ये सर्वसामान्यांसाठी रेशन कार्ड कॅम्प घेत आहेत. या माध्यमातून सर्वसामान्यांना या कॅम्पचा लाभ होत आहे असे मत राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके यांनी व्यक्त केले.

रेशन कार्ड हे नागरिकांचे ओळखपत्र असून, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी त्याची आवश्यकता आहे. याच उद्देशाने मांडवे खुर्द येथे निलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून तालुकाध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांच्या संकल्पनेतून रेशन कार्ड कॅम्पचे यशस्वी आयोजन करण्यात आले. राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके आणि मांडवे खुर्दचे माजी सरपंच सोमनाथ आहेर यांच्या उपस्थितीत कॅम्पची सुरुवात झाली.

ग्रामीण भागातील नागरिकांना रेशन कार्ड मिळवण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन हा उपक्रम राबवण्यात आला.या कॅम्पद्वारे नागरिकांना कागदपत्रांची पूर्तता आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यात आली. शेकडो ग्रामस्थांनी या कॅम्पचा लाभ घेतला. विशेषतः ज्यांच्याकडे रेशन कार्ड नव्हते किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी होत्या, त्यांना मार्गदर्शन आणि सहाय्य मिळाले. दीपक लंके यांनी सांगितले की, रेशन कार्डामुळे गरजू कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ मिळेल आणि हा उपक्रम सामाजिक विकासाला चालना देणारा आहे.

कॅम्पमध्ये सामाजिक कार्यकर्ते मोहन रोकडे, श्रीरंग रोकडे उद्योजक रवींद्र ढोकळे, लखन ठाणगे, कैलास गागरे, गौतम बागुल, सुधीर जाधव, सागर पवार, रेवन पवार, अंकुश पवार, संजय पवार, रावसाहेब गागरे, जगन्नाथ जाधव, बाळासाहेब रोहकले, संजय गागरे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. स्वयंसेवक आणि प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. कॅम्पच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी निलेश लंके प्रतिष्ठान आणि बाळासाहेब खिलारी यांचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेणे सोपे होत असून, सामाजिक विकासाला चालना मिळत आहे, असे मत नागरिकांनी व्यक्त केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सातारा मार्फत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२६, महाबळेश्वर (सातारा) :** जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सातारा व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह वाई येथे वाई, खंडाळा, महाबळेश्वर व मेढा (जावली) तालुक्यातील नागरी, ग्रामीण, नोकरदार पतसंस्थाचे अधिकारी पदाधिकारी कर्मचारी यांच्यासाठी एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन मंगळवार दि.२४ रोजी करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घघाटन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सातारा संजयकुमार सुद्रिक यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची प्रस्तावना अनिल क्षीरसागर सहाय्यक निबंधक वाई यांनी केली. अरुण काकडे विभागीय समन्वयक एम सीडीसी कोल्हापूर, अनुराधा पंडीतराव सहाय्यक निबंधक महाबळेश्वर, प्रिती काळे सहाय्यक निबंधक खंडाळा, सुनिल जगताप सहाय्यक निबंधक मेढा यांनी सहकार क्षेत्राबाबत माहिति तसेच आपले मनोगत व मार्गदर्शन केले.

त्याचप्रमाणे नंदकुमार भोईट सेवानिवृत्त नायब तहसीलदार यांनी ७/१२ वाचन, कर्ज बोजा नोंद, महसुली नोंदी इत्यादी करताना दक्षता कशी घ्यावी याची परिपुर्ण माहिति दिली. नंदकुमार भोईटे यांनी सायबर सेक्युरीटी बाबत माहिति दिली. अरुण काकडे यांनी ठेव संकलन, ग्राहक केंद्रित सोयी सुविधा याबाबत माहिती दिली. तसेच ॲड.बी.एस. जाधव व डॉ.मुरुडकर यांनी बॅंकिंग व सहकार क्षेत्रातील माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांच्या हस्ते उपस्थित पदाधिकारी, कर्मचारी यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सदरचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पाडण्यात सहाय्यक निबंधक कार्यालय अधिकारी प्रमोद चतुर, संजय वेंदे, शेखर साळुंखे, अक्षय चव्हाण, सुहास अंब्राळे, राजेंद्र धनावडे यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रशिक्षण कार्यक्रमास वाई खंडाळा मेढा (जावली) तालुक्यातील नागरी, ग्रामीण, नोकरादार पतसंस्थाचे अधिकारी पदाधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

## पुणे स्टेशनचे नाव बदलून छ.शाहू महाराजांचे नाव ठेवावे 'आप' चे प्रशांत कांबळे यांची मागणी





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, पुणे :** पुणे स्टेशनचे नाव बदलण्यात यावे विविध पक्ष यांची मागणी आता जोर धरू लागली आहे. छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीच्या निमित्ताने आम आदमी पार्टी पुणे शहराध्यक्ष प्रशांत कांबळे सामाजिक न्याय विभाग यांनी केली आहे. शाहू महाराजांवरती महाराष्ट्रामध्ये राजकारण करून सत्ता मिळवली परंतु आत्तापर्यंत पुणे शहरामध्ये त्यांचे कुठेही भव्य स्मारक पुतळा उभारण्यात आलेला नाही. पुणे स्टेशनचे नाव बदलून काहीही होणार नाही. पुणे शहराच्या दृष्टीने त्या स्टेशनचे नाव पुणे हे योग्यच आहे.

परंतु काही जातीवादी धर्मवादी हिंदी भाषेपासून भरकवटण्याचा प्रयत्न काही लोक करताना दिसतात. निवडणूक आली की जाती धर्मामध्ये तेढ निर्माण व्हावा. असं कुठेतरी जाती धर्माचं राजकारण करून लोकांना भरकवटात. पुण्यामध्ये अनेक समस्या असताना देखील त्या कुठे सोडवताना हे धर्मवादी दिसत नाही. जर पुणे स्टेशनचे नाव बदलीच करायचं असेल तर छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, संत कबीर, लहुजी वस्ताद साळवे ही महापुरुषांची नावे का देऊ नये नाव बदली करून काहीही साध्य होणार नाही. त्यापेक्षा मराठी शाळा वाचवा नागरिकांच्या अनेक समस्या सोडवा अशी आम आदमी पार्टी कडून मागणी होत आहे.

## पांडुरंगाचरणी शिरवळ जिमखाना सायकल वारी



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२५, खंडाळा (सातारा) :**

**देहभान विसरूनी चाले पंढरीला ।**
**डोळ्यात साठवावे विठ्ठल रूपाला ।**
**पायांऐवजी चाके फिरली ।**
**तरीही मनं विठ्ठलभक्तीत रंगली ।।**

नुकतेच आखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकलवारी संमेलनाचे आयोजन पंढरपूर येथे करण्यात आले होते. यामधे राज्यातील ९७ सायकलगटांचे साधारणपणे ४१०० सायकलस्वार सहभागी झाले होते. शिरवळ जिमखान्याच्या वतीने २७ सायकलस्वार यामध्ये एक १० वर्षाचा अर्णव प्रशांत कबुले हा छोटा सायकल स्वारदेखील सामील झाला होता.

शिरवळ जिमखान्याच्या सायकल स्वारांनी दि.२१ रोजी पहाटे ४.३० वाजता ईच्छापुर्ती गणेश मंदिरात वंदन करून सुरुवात केली.रस्त्यामध्ये योगाचा प्रसार करत, फिटनेस का डोस सायकलिंग अधा घंटा रोज, सायकल चालवा पर्यावरण संवर्धन व रक्षण करा,सायकल चालवा इंधन वाचवा अश्या घोषणा देत व विठुनामाचा गजर करत सायंकाळी ६ वाजेपर्यंत पंढरपूरला आध्यात्मिक वातावरणात

यानंतर दि.२२ला सकाळी ६ वाजता सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सायकल नगरप्रदक्षिणेचा शुभारंभ केला. तद्नंतर रेल्वे मैदानावर रिंगण सोहळा पार पडला. यावेळेस केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहीते पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, प्रशांत परिचारक व मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमा दरम्यान जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे व उत्कृष्ट सायकल स्वार म्हणून अजय चौगुले यांचा सन्मान करण्यात आला.

शिरवळला सायकल दिंडी पोहोचल्यानंतर बाल गणेश मंडळ कार्यकर्ते व माजी सभापती राजेंद्र तांबे यांनी सर्व सायकलस्वारांचा सत्कार केला. या सत्कारासाठी सायकलिंग प्रभारी डॉ.राजेंद्र देशमुख यांनी आभार मानले.

## संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात भक्तीमय वातावरणात आगमन





**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२६, सातारा :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आज दि.२६ रोजी टाळ मृदुंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात मोठ्या आनंदाने आणि भक्तीमय वातावरणात सातारा जिल्ह्यात पाडेगाव येथे आगमन झाले. फडफडणाऱ्या भगव्या पताका, टाळ मृदुंगाचा गजर आणि हरिभजनात तल्लीन होऊन संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा भक्तीरसात चिंब न्हाऊन निघाला.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन होताच जिल्ह्याच्यावतीने पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, खासदार नितीन पाटील, आमदार सचिन पाटील, आमदार मनोज घोरपडे, माजी खासदार रणजीतसिंह नाईक- निंबाळकर, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पूलकुंडवार, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, वाईचे प्रांतअधिकारी राजेंद्र कचरे यांनी पुष्प अर्पण करुन व पोलीस बॅंड पथकामार्फत विविध धून वाजून स्वागत केले.

नीरा नदीतील स्नानानंतर संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यातील पाडेगाव येथे मान्यवरांनी तसेच लाखो भाविकांनी दर्शन घेतले. माऊलींच्या दर्शनासाठी भाविकांनी एकच गर्दी केली होती.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२५ निमित्त वारकऱ्यांच्या सेवेसाठी गावनिहाय सुविधा माहिती व लोकेशन मार्गदर्शनाचा पंचायत समिती खंडाळा व फलटण यांनी उत्कृष्ट पद्धतीने पहिल्यांदाच तयार क्यू आर कोड तयार केला आहे. याद्वारे वारकऱ्यांच्या सोयीसाठी काही गावांमध्ये अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या माध्यमातून प्रत्येक गावातील शौचालय, आरोग्य सेवा, पाणी, महिला स्नानगृहे, मुक्काम, निवास, पेट्रोल पंप व संपर्क माहिती मिळत आहे, याबद्दल वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रशासनाने वारकऱ्यांसाठी ठिकठिकाणी पिण्याचे पाण्याचे टॅंकर, आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच जागोजागी स्वच्छतागृहांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. वारकऱ्यांच्या सुरक्षेतेसाठी चोख पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आलेला आहे.

## खेळाडूंना शासकीय क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेश संधी

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२६, मुंबई :** शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनी मध्ये २०२५-२६ करीता सरळ व कौशल्य चाचणी द्वारे निवासी व अनिवासी खेळाडू करीता नवीन प्रवेश देण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी राज्यातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करून त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार व अद्यावत क्रीडा सुविधा पुरवून त्यासाठी सुसंघटित प्रयत्न करण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती क्रीडापीठ म्हाळुंगे बालेवाडी पुणे अंतर्गत राज्यात विविध क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. सन २०२५-२६ साठी शिवछत्रपती क्रीडा विद्यापीठ अंतर्गत सदर ०६ क्रीडा प्रबोधिनीत सरळ प्रवेश (५०%) व कौशल्य चाचणी (५०%) प्रक्रिये अंतर्गत निवासी व अनिवासी प्रवेश देण्यात येणार आहेत.

**क्रीडा प्रबोधिनी ठिकाणे** - राज्यात पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, गडचिरोली, अशा ९ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली होती. सदर ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी मध्ये क्रीडा प्रशिक्षणार्थींची निवड करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**क्रीडा प्रबोधिनी मधील क्रीडा प्रकार** - ज्युडो, जिम्नॅस्टिक्स हॉकी, शूटिंग, फुटबॉल, जलतरण, अथलेटिक्स, कुस्ती बॅडमिंटन, आर्चरी, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, ट्रायथलॉन, सायकलिंग, बॉक्सिंग, अशा १७ क्रीडा प्रकारात प्रशिक्षण देण्यात येते.

**सरळ प्रवेश प्रक्रिया** - क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधित्व केलेले खेळाडू यांचे वय १९ वर्ष आतील आहे.अशा खेळाडूंना संबंधित खेळाबाबतची चाचणी तज्ञ समिती समक्ष देऊन प्रवेश निश्चित केला जातो.यामध्ये ०७/०७/ २००६ नंतर जन्मलेले व ८/७/ २०२५ रोजी पर्यंत १९ वर्ष पूर्ण झालेले खेळाडू असणे आवश्यक आहे.

**खेळनिहाय कौशल्य चाचणी** - क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर सहभागी खेळाडूंना यांचे वय १९ वर्ष आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाच्या खेळनिहाय कौशल्य चाचणीचे आयोजन करून गुणानुक्रमे प्रवेश निश्चित केला जातो.यामध्ये ७/७/२००६ नंतर जन्मलेले व ८/७/२०२५ रोजी पर्यंत १९ वर्षे पूर्ण झालेले खेळाडू असणे आवश्यक आहे.

जिल्हास्तरावर क्रीडा प्रबोधिनी विभाग चाचणीसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडूंचे नाव, जिल्हा, खेळप्रकार, जन्मदिनांक, वय व क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र याबाबत माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर शासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालय खालील परिसर संभाजीनगर समोर, आकुर्ली रोड, कांदिवली पूर्व, मुंबई -४००१०१ येथे २८ जून पर्यंत सादर करावी. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी दिली.

## महागणपती मल्टीस्टेटच्या यशाचा टप्पा १०० कोटी ठेवींचा विक्रमी मैलाचा दगड पार



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२६, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर - महागणपती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने आपल्या प्रगतीच्या प्रवासात एक ऐतिहासिक यश संपादन केले आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास विठ्ठल बेंगडे पाटील यांनी दि २१ रोजी सोसायटीने १०० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा पार केल्याची अधिकृत घोषणा केली.

ही भरारी केवळ आर्थिक यश नाही, तर नाविन्यपूर्ण योजनांचा, विश्वासाचा आणि सामूहिक प्रयत्नांचा दैदिप्यमान परिणाम आहे. आधार मासिक व्याज योजना, गृहलक्ष्मी सन्मान योजना, सुकन्या मंगल योजना, चिरंजीव कल्याण योजना, धनलक्ष्मी आवर्ते योजना, लखपती योजना, विविध 'दाम' गुंतवणूक योजना व मुदत ठेव योजना यासारख्या प्रभावी नाविन्यपूर्ण योजनेद्वारे महागणपतीने सामान्य माणसाच्या स्वप्नांना हातभार लावला आहे.

केवळ योजना नव्हे, तर संस्थेने भावनिक नाते जपणाऱ्या विविध उपक्रम द्वारे सभासदांना कायम आपलंसं ठेवलं आहे. खास ठेविदारांसाठी आंबा महोत्सव, दिवाळी फराळ वाटप, पैठणी साडी भेट, वाढदिवस साजरे करणं, अष्टविनायक व ज्योतिर्लिंग यात्रा हे उपक्रम सोसायटीची वेगळी ओळख निर्माण करतात.

महागणपती परिवारात आज १३ हजार ६०० पेक्षा अधिक सभासद, १८ कार्यरत शाखा आहेत. या शाखा पुणे व सातारा जिल्ह्यांमध्ये विखुरलेल्या असून, मोशी, भोसरी, चिखली, शिवणे, जुन्नर, ओतूर, निघोज यांसह १८ ठिकाणी सेवा दिली जात आहे.

या ऐतिहासिक यशाबद्दल विकास विठ्ठल बेंगडे पाटील यांनी सर्व ठेवीदार, सभासद, हितचिंतक व महागणपती परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले व पुढील काही नजिकच्या महिन्यांत २५० कोटींच्या टप्प्याकडे वाटचाल सुरू असल्याचं सूतोवाच त्यांनी केलं.

महागणपती मल्टीस्टेट चे तुमच्या विश्वासाची आणि भविष्यातील सुरक्षिततेची खात्री ! या तत्वाने वाटचाल सुरू आहे.

## तरुण पिढी सक्षम राहिली तरच देशाचे नेतृत्व करू शकेल : पोलीस उमहानिरीक्षक पाटील



**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.२६, खडकवासला (पुणे) :** भारत हा युवकांचा देश असून युवा पिढीकडून देशाला खूप अपेक्षा आहेत. आपण महासत्तेकडे वाटचाल करीत असताना त्यात युवक- युवतींचे योगदान मोठे आहे. तरुण पिढी सक्षम राहिली, तरच देशाचे नेतृत्व करू शकेल. तरुणाईला व्यसनाधीनतेकडे व वाईट प्रवृतींकडे आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरु असून हा देशाच्या प्रगतीत मोठा अडथळा आहे, असे मत राज्याच्या अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे पोलिस उपमहानिरीक्षक प्रवीण पाटील यांनी व्यक्त केले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तर्फे आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ सेवन व अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त नऱ्हे येथील संस्थेच्या सभागृहात जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलिंद भोई, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दूल जाधवर, पर्यावरण कार्यकर्ते विष्णू लांबा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष समितीचे शशिकांत कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त शपथ देखील घेतली. प्रवीण पाटील म्हणाले, आपल्याकडे अनेक कायदे आहे, त्यातील कायदे चांगले व उपयुक्त देखील आहेत. आजची पिढी संस्कृतीकडून दूर जात नाही ना, हे पाहणे आवश्यक आहे. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती, त्यामुळे मुलांकडे लक्ष रहात असे. आता आपल्याला वेळ नाही. त्यामुळे मुलांकडे दुर्लक्ष झाले, तर ती चुकीच्या मार्गाकडे जातील. प्रत्येक गोष्टीत सकारात्मकता असून त्याकडे त्यादृष्टीने पाहायला हवे. डॉ. मिलिंद भोई म्हणाले, अंमली पदार्था विरोधात केवळ एका दिवस नव्हे, तर वर्षभर लढायला हवे. हे पदार्थ कसे तयार होतात, त्याचे वितरण कसे होते आणि हे किती घातक आहे, याची माहिति देत आम्ही जनजागृती आम्ही करीत आहोत. सरकार आणि प्रशासन याविषयी आपापल्या स्तरावर काम करीत आहे. मात्र, लोकसहभागातून याविषयी काम होणे आवश्यक आहे. ॲड. शार्दूल जाधवर म्हणाले, आपल्या देशात १४० कोटी नागरिक राहतात. त्यातील ८५ कोटी पेक्षा जास्त युवा पिढी आहे, असे अनेक सर्वेक्षणात म्हटले आहे. युवा पिढी व्यसनाधीन आहे की नाही, यावरून त्या देशाचे भविष्य समजू शकते. त्यामुळे दारू, अंमली पदार्थ याकडे आकृष्ट होणाऱ्या पिढीला त्यापासून दूर ठेवायला हवे.

